# "गैरसमज"

शाळेत आज सुभाषित भावार्थ दिप" या आंतरशालेय स्पर्धेचा निकाल होता. वेगवेगळ्या शाळेतून विद्यार्थी त्यांच्या शिक्षक / शिक्षिकांसह येत होते. सगळीकडे आनंदाचे व उत्साहाचे वातावरण होते. हिंदू ज्ञानपीठ शाळेत अशा नेहमीच विविध विषयांवर स्पर्धा होत असत. पारितोषिक वितरण मात्र शिक्षण क्षेत्रातील दिग्गज विद्वान मंडळींकडून होत असे.

आजच्या स्पर्धेचे पहिले बक्षीस हिंदू ज्ञानपीठ शाळेतील वर्ग ९ ची विद्यार्थीनी स्मिता घरवाई हिलाच नेहमीप्रमाणे मिळणार याची विद्यार्थ्यांनाच नव्हे तर शिक्षकांनाही खात्री वाटत होती. स्मिता मात्र जरा साशंकच होती. जेव्हा स्पर्धा झाली होती तेव्हा लोकांच्या शाळेतील १० व्या वर्गातील एका विद्यार्थ्याने खुपच स्पष्ट, खणखणीत आवाजात विचारलेल्या सुभाषितांची अर्थसाहित व्यवस्थित मांडणी केली होती. हा कोण आपल्या स्पर्धेतील प्रतिस्पर्धी असं नवलाने ती बघत होती.

आणि आता तो क्षण आला परिक्षकांनी मुख्य पाहुण्यांच्या हाती निकालाचा कागद दिला. धडधडत्या अंतःकरणाने स्मिता व तिच्या मैत्रिणी निकाल ऐकु लागल्या. पहिले पाच, चार, तीन क्रमांकांची नांवे सांगून झाल्यावर दुसरा क्रमांक कु. स्मिता सुरेशराव घरवाई आणि पहिला क्रमांक प्रवीण सुधाकर देशमाने याचा अशी घोषणा ऐकल्याबरोबर लोकांच्या शाळेच्या जयजयकाराने वातावरण भारून गेले. हिंदू ज्ञानपीठ शाळेला आपल्याच शाळेला बक्षिस मिळेल अशी खात्री होती, त्यामुळे त्यांना धक्काच बसला. स्मिता तर रडायलाच लागली. एवढ्या महत्वाच्या स्पर्धेत आपला नंबर आला नाही, तिला खुप वाईट वाटले. तिला बक्षिस देतांना पाहुण्यांनी तिचे पण कौतुक केले. पण सगळेजण प्रवीणचाच उदोउदो करीत होते. कशीबशी कार्यक्रम संपेपर्यंत ती खाली मान घालून बसून राहयली. जसा कार्यक्रम संपला

तशी कोणाशीही न बोलता घरी जाण्यास निघाली. तिच्या मैत्रिणी अगं, अगं थांब तरी, म्हणत असेपर्यंत ती सायकलने निघाली सुध्दा. दुसरा नंबर आला तरी तिला ते स्वतःचे अपयश वाटले. तिच्या सर्व शिक्षकांचाही अपेक्षाभंग झाला पण तरीही त्यांनी तिला धीर दिला;

कांही दिवसांनी अशीच पुन्हा वक्तृत्व स्पर्धा जाहिर झाली. विषय होता "मोबाईल शाप की वरदान" आणि तिथेही स्मितचे सगळे मुद्दे बरोबर खोडून प्रवीणनेच बाजी मारली. आणि पुढीलही ३/४ स्पर्धेत ती कायम मागे राहू लागली. तिला नकळत प्रवीणचा राग येवू लागला. आजपर्यंत सगळे तिचेच कौतुक करीत होते. पण आता मात्र सगळ्यांच्या तोंडी प्रवीणचेच नांव यायला लागले तिला तो स्वतःचा अपमान वाटला. तिच्या आईच्या लक्षात तिच्या अबोल राहण्याचे कारण आले. तिने प्रेमाने स्मिताला समजावून सांगितले. आता आता कुठे माझी स्मिता उमलणाऱ्या फुलाप्रमाणे उमलू लागली; पण या अपयशामुळे तिने स्वतःला फुकटेपणाच्या कोशात बांधून टाकले; अग नेहमीच पहिला नंबर आला पाहिजे असं नाही; तू छान बोलतेस; लिहीते !! तरीही स्मिताच्या चेहऱ्यावरील स्मितहास्य जणू गायबच झाले. अभ्यासातही तिचे मन लागेना --

तिचे गावाकडील काका मुलीच्या लग्नासाठी एका स्थळाकडे जायचे म्हणून त्यांच्या घरी आले. दाखवण्याचा कार्यक्रम झाला; मुलगी पसंत आहे हा निरोपही आला. स्मिताने कशातच भाग घेतला नव्हता. तिला लग्न ठरले आहे एवढच माहीती झालं. मग मुलाकडच्यांनी घरवाई कडील सगळ्यांना पुढील बोलणी नक्की करायला त्यांच्या घरीच जेवायला बोलावले. तेव्हा तिला कळलं की प्रवीणच्या मोठ्या भावाशीच तिच्या चुलत बहिणीचे शिल्पाताईचे लग्न ठरत आहे. देशमाने म्हणजे प्रवीणचेच घर असेल असं तिला वाटलंच नव्हतं. गेल्यावर मात्र सगळेजण हास्यविनोदात गप्पा करीत होते. प्रवीणचे

AIT Global India Pvt. Ltd.

आई बाबा पण स्मिताचे कौतुक करू लागले. कारण ते पण तिच्याबद्दलची माहिती जाणून होते; पण स्मिता मात्र प्रवीणला आपला प्रतिस्पर्धी मानू लागली होती त्यामुळे ती गप्प गप्पच होती. काकांनी मग लग्नाची तारीख ठरवूनच बोलणी पक्की केली. आता दोन्ही घरी लगीनघाई सुरु झाली. निमित्ताने प्रवीण - स्मिताच्या भेटी होत होत्या. प्रवीण एकदम मोकळा व आनंदी मुलगा होता. आपला अभ्यास सांभाळून तो घरच्या लग्नखरेदीला अधून-मधून जात असे. स्मिताचे लक्ष अभ्यासातही लागत नव्हते. हा कोण टिकोजीराव, कानामागून आला आणि तिखट झाला. प्रवीण मुद्दाम जरी नाही तरी कारणपरत्वे तिच्याशी बोलत होता. पण तिची कळी कांही खुलत नव्हती. लग्नही छान पार पडले. आता परिक्षेचे दिवस जवळ आले, तिचे मन अभ्यासातही लागेना. परिणामी चाचणी परिक्षेत कमी गुण. आता वार्षिक परीक्षेची तयारी. प्रवीणबद्दलच्या अकारण पुर्वग्रह तिला बेचैन करीत असे
२ आतापर्यंत सगळेजण माझी वाहवा करत होते. हा मध्ये आला आणि सगळंच बिनसल! ती विमनस्क होऊ लागली. पूर्वी मोकळी हसणारी - बोलणारी स्मिता आजकाल उदास असलेली बघून तिचे वर्गशिक्षकही तिला समजवत. त्यांना वाटले पहिला नंबर हुकल असल्यामुळे ती चिडाचिडी झाली, पण त्याचा अभ्यासावर परिणाम होवू देवू नकोस असं सगळेच सांगत, पण त्याचा स्मितावर काहीच परिणाम व्हायचा नाही. उलट शब्दांच्या जागी तिला प्रवीणचे भव्य दिव्य यश अशीच अक्षरे दिसायची. बरं, याबाबत कोणाशीच मोकळेपणाने बोलता येत नव्हते. प्रवीणलाही तिच्यातील हा बदल जाणवू लागला. आपलं काय चुकले हेच त्याला कळेना, त्याला पण तिची काळजी वाटू लागली; कारण आधी स्मिता किती दिलखुलास होती हे त्याने सगळ्यांकडून ऐकले होते. मग आता काय झालं हिला ?!

AIT Global India Pvt. Ltd.

आपण त्यामागचे कारण आहे हे तर त्याच्या स्वप्नातही नव्हते. कधीमधी भेट झाली तर आपल्या वहीनीची बहीण म्हणून तो बोलण्याचा प्रयत्न करी, पण तिचे बोलणे ऐकले की, फीस्कारलेल्या मांजरीचीच त्याला आठवण येई. समज गैरसमजाच्या लाटेवर दोघेही हेलकावे खावू लागले. दोघांची शाळा वेगळी. नेहमी भेटही होईना, प्रवीणाला भेटावेसे वाटायचे पण स्मिताची प्रतिक्रिया नकारात्मक असायची. तिलाही कळेना !! असा कोण लागून गेला हा की त्यामुळे मी माझं करीयर खराब होवू देवू ?? नाही असं नाही करणार मी, मी खूप अभ्यास करेन. असं मनाला समजावता समजावता ती थकून जाई. असा काय दोष त्याचा ?? माझ्यावर कुरघोडी केल्याने माझी प्रतिमा बिघडली असा समज तिने करून घेतला. आणि म्हणूनच साध्या साध्या गोष्टीलाही आनंद ती घेऊ शकत नव्हती.

तिची अवस्था आईला बघवत नव्हती, एकुलती एक लाडकी लेक अशी कोमेजून चालली, मोकळेपणाने बोलत नाही, बाबांशी चर्चा करून यावर काय उपाय शोधायचा हेच कळेना आपापल्या परीने दोघेही प्रयत्न करु लागले, त्यांच्या हे लक्षात आले की प्रवीणाला भेटली, त्याचा विषय निघाला की सैरभैर होते, असं आडनीड वय, धड लहान नाही की मोठी पण नाही, कसं समजवायच हिला !! हा गुंता हळुवार सोडवायला हवा, कोण मदत करेल, यातून तिला सहीसलामत बाहेर यायला ?? विचार केल्यावर त्यांना तिच्या शाळेतील चौरघडे सरांची आठवण आली, ते नक्कीच स्मिताला या दडपणातून बाहेर काढतील, बघू या - प्रयत्न तर करु असं म्हणून त्यांनी चौरघडे सरांची निवांतपणे भेट घेवून स्मिताबद्दलची सगळी हकीकत सांगितली. सरांना तिच्या नकारात्मकतेचा अनुभव आलाच होता, कारणांची सांगतवार जुळवणी केल्यावर त्यांच्या लक्षात आले की आत्तापर्यंतच्या प्रत्येक परिक्षा / स्पर्धा यामध्ये स्मिताने पहिला नंबर कधी सोडला नव्हता,

AIT Global India Pvt. Ltd.

पण संस्कृत पाठांतर परिक्षेत तिचा दुसरा नंबर आल्याने तिला धक्का बसला. मानसिकरित्या ती तयारच नव्हती, आपला नंबर प्रविणने हिसकावून घेतला आणि पुढेही प्रत्येक वेळेस असच घडत गेलं, त्यामुळे ती मनाने खचली. प्रविणला आपला शत्रू समजू लागली आणि म्हणूनच त्याचा द्वेषही करू लागली. अजाणत्या वयात मनाने पकडलेली गोष्ट धोतली ती कायमच कोरली जाते. त्याच खर कारण काय हे सुद्दा तिला नीट कळालं नव्हतं. आता तर पुढचं १० वीचं महत्वाचं वर्ष !! अशी कोलमडून पडली तर काय तिचं भविष्य ?? तिला यातून बाहेर काढावच लागेल. असा मनाशी निश्चय करून चोरघडे सर आधी प्रविणच्या घरी गेले. त्याला आणि त्याच्या आई बाबांना सर्व समजावून सांगितले. त्यांनाही स्मिताबद्दल वाईट वाटले. प्रविणला तर आपल्यामुळेच तिच्या अभ्यासावर वागण्यावर परिणाम झाला. हे ऐकून सुन्नेनास झालं. सगळ्यांनी मिळून मग स्मिताशी मोकळेपणाने बोलून तिच्या मनातली अढी काढून टाकली.

स्मिताला पटलं, असा कसा माझा नेहमीच पहिला नंबर येईल ?? माझ्यापेक्षाही जास्त मेहनत करणाऱ्याला हे यश नक्कीच मिळू शकते. उगाचच मी प्रविणशी उद्दटपणाने वागले, त्याला किती वाईट वाटलं असेल ?? तरीही सगळं विसरून तो माझ्याशी बोलायचा. मी समजायचे की तो मला मुद्दाम खिजवतो. खरच, खूप मोठी चूक झाली माझ्याकडून !! एका निरागस मनाला किती दुःख दिलं ? आणि हे काय करत होते मी ?? स्पर्धा टाळणं, परिक्षेत कमी गुण मिळवणं. याने झाला तर माझ्याच अभ्यासावर वाईट परिणाम होईल बर झालं, सगळ्या वडीलधाऱ्या मंडळींनी चोरघडे सरांच्या मदतीने माझ्यातला न्यूनगंड काढून टाकला... खूप वेगवेगळी उदाहरणे देऊन त्यांनी माझ्या मनातली अढी काढून टाकली !! आजपर्यंत त्यांची शिस्त पाहिली होती पण आज त्यांचं हळूवार मनही दिसून आलं. एका मार्ग चुकलेल्या कोकराला जणू काही त्यांनी मार्ग दाखवला.

स्मिताने सगळ्यांची माफी मागितली.

अर्थातच सगळ्यांनी तिला समजून घेवून माफ केले. 'पुढचे आरव्ख आयुष्य तुला साद घालत आहे त्याला धिटाईने सामोरे जा; यश प्रत्येक वेळेस मिळेलच असं नाही. अपयशातूनही शिकावं लागतं. चल आता माझ्या सगळ्या १० वी च्या नोट्स तुला अभ्यासाला देईन. सुरवातीपासून १० वी च वर्ष असलं तरी पहिल्यासारख आनंदी राहून स्पर्धेत भाग घेत जा. अभ्यासाचे वेळापत्रक ठरवाले की सगळं जमतं, याशिवाय कोही मदत लागली तर मी आहेच' असं प्रविणने म्हणताच स्मितानेही 'आता नक्की अभ्यासाकडे लक्ष देईन' असे सर्वांना आश्वासन दिले.

सर्वांचे आभार मानतांना स्मिताच्या आईवडिलांचे डोळे पाणावले होते, आमची पूर्वीची हसरी-खेळती-बागडती स्मिता तुमच्यामुळे आम्हाला परत मिळाली !! त्यासाठी धन्यवाद द्यायलाही शब्द अपुरे पडतात !! सगळ्यांनी आनंदाने स्मिताचा निरोप घेतला. अखेरीस गैरसमजाचे धुके विरळून स्मिताचे स्मितहास्य परत मिळाले !!

शब्दांकन : सौ. विजया जोशी.          श्री विष्णू रामचंद्र उपाध्ये



